# कृषी कर्ज /कृषी वित्त: agricultural finance/ credit

By

Dr. Rajani Sontakke

Associate professor

Economics

# कृषी वित्त

शेतकऱ्यांच्या वीता संबंधी कर्जावर प्रामुख्याने दोन बाजूंनी विचार केला जातो.

1. ऋण चां उद्देश

2. ऋणणाच्या वसुलीचा कालावधी.






# कृषी वित्त / कृषी कर्ज

प्रस्तावना : Introduction

- कृषी कर्जाची समस्या वाणिज्य आणि उद्योगाकरिता घेण्यात आलेल्या  वित्ताच्या समस्यांपेक्षा वेगळी आहे. वाणिज्य आणि उद्योग हे संघटित व्यवसाय आहे आणि त्यांची वित्ताची मागणी उत्पादक कार्याकरिता होत असते .याच कारणामुळे  वित्ताची मागणी पूर्ण करण्याकरिता खूप वर्षांआधी विभिन्न देशांमध्ये बँका आणि औद्योगिक विकासाच्या विशिष्ट संस्थांचा विकास झाला आहे. कृषी त्यामानाने असंघटित व्यवसाय आहे. यांची यशस्वीतता व अयशस्वीतता बऱ्याचअंशी मोसमा वर अवलंबून असते
- याशिवाय शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या  ऋणांमध्ये स्पष्टपणे उत्पादक व अनुत्पादक असा भेद करणे सोपे नसते .त्यामुळे बँकांनी शेतीकरिता किंवा त्याच्याशी संबंधित दुसऱ्या कार्याकरिता ऋण देण्याकरिता कधीच स्वारस्य दाखविले नाही .आणि बऱ्याच कालावधीपर्यंत शेतकरी ऋणकरिता प्रामुख्याने सावकार व महाजन वर अवलंबून राहिला.

# कृषी ऋणाची आवश्यकता व स्त्रोत:



# कृषी वित्ताचे स्त्रोत Sources of Agricultural credit

1) संस्थागत स्त्रोत

2) गैर - संस्थागत स्त्रोत

- 1) संस्थागत स्त्रोत institutional sources
- 2) गैर - संस्थागत स्त्रोत non institutional sources
- संस्थागत स्त्रोत :

1. सहकारी कर्ज समित्या.
2. भूविकास बँका.
3. व्यापारी अधीकोष.
4. क्षेत्रिय ग्रामीण बँका.
5. सरकार.

# गैर-संस्थागत स्त्रोत

1. सावकार व.महाजन.
2. व्यापारी व कमीशन एजंट.
3. नातेवाईक व मित्र.
4. जमीनदार व इतर.
5. सरकार.

# कृषी आणि ग्रामीण विकासाची राष्ट्रीय बँक (नाबार्ड)

National bank for agriculture and rural development (n a b a r d)

- ग्रामीण विकासाच्या क्षेत्रातील महत्त्वपूर्ण घटना म्हणजे 19जुलै 1982 रोजी करण्यात आलेली नाबार्ड ची स्थापना होय. ही बँक ग्रामीण वित्त मधील शीर्षक संस्था आहे. ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात ती सर्व कार्य जी आधी रिझर्व बँकेत द्वारे केली जात होती, आता ती नाबार्ड द्वारे केली जात आहेत.
- ग्रामीण भागाचा संतुलित विकास करून त्यांना समृद्ध करण्याच्या उद्देशाने शेती, लघुउद्योग, ग्रामोद्योग ,हस्तोद्योग व इतर आर्थिक उपक्रमांना मदत करण्याच्या दृष्टीने नाबार्ड वाटचाल करीत आहे.

# नाबार्ड ची उद्दिष्टे: objectives of NABARD

1. शेती विकासाकरिता कर्जाची सोय करून देणे.
2. इतर ग्रामीण व्यवसायांना कर्जपुरवठा करणे.
3. ग्रामीण समृद्धी व समन्वित विकासाकरिता आर्थिक सहाय्य देणे.

- नाबार्डची कार्य: functions of NABARD

1. ग्रामीण कोणाच्या क्षेत्रात नाबार्ड ही शीर्षक संस्थेच्या रूपात कार्य करते.
2. आपल्या कृषी वित्त विभागाच्या माध्यमातून ती सहकारी क्षेत्रातील हालचालींवर नजर ठेवत असते.
3. हंगामी कृषी कार्याकरिता कृषिमालाच्या विक्रीकरिता खतांच्या खरेदीकरिता व वितरणा करिता तसेच सहकारी साखर कारखान्यांची कार्यशील भांडला करिता सहकारी बँकांना अल्पकालीन ऋण ( 18 महिन्यांच्या कालावधीकरिता) प्रधान करते.
4. निर्धारित कृषी उद्देश परिष्करण समित्यांच्या शेअरची खरेदी तसेच नैसर्गिक संकटग्रस्त भागांना अल्पकालीन ऋणातून मध्यकालीन ऋणात परिवर्तन करण्याकरिता ही राज्य सहकारी बँक तसेच क्षेत्रीय ग्रामीण बँकांना मध्यकालीन ऋण ( 18 महिने ते 7 वर्षे पर्यंत) प्रधान करतो.

# नाबार्डची कार्य

- 5. कृषी तील मोठ्या गुंतवणूक कार्याकरिता ही राज्य सहकारी बँका भूविकास बँका क्षेत्रीय ग्रामीण बँका तसेच व्यापारी बँकांना मध्यकालीन व दीर्घकालीन ऋण (जास्तीत जास्त 25 वर्षाकरिता) प्रदान करतो.
- 6. सहकारी ऋण संस्थांच्या भाग भांडलवलात योगदान देण्याकरिता ही राज्य सरकारांना ऋणाच्याया रूपात दीर्घकालीन सहायता प्रदान करतो (अधिकतम 20 वर्षाकरिता.)
- 7. केंद्र व राज्य सहकारी बँक तसेच क्षेत्रीय ग्रामीण बँकांच्या निरीक्षणाची जबाबदारी कृषी आणि ग्रामीण विकासाच्या राष्ट्रीय बँकेला म्हणजेच नाबार्डला सोपविण्यात आलं केंद्रीय व भूविकास बँक तसेच इतर फेडरेशन सहकारी संस्था सुद्धा स्वच्छेने या बँकेचे निरीक्षण करू शकतात.
- नाबार्ड बँक संशोधन व विकास फंड ठेवतो जेणेकरून कृषी व ग्रामीण विकास कार्यक्रमाद्वारे संशोधन करण्यास प्रोत्साहन दिले जाऊ शकते तसेच नवीन भागांच्या आवश्यकतेनुसार योजना बनविल्या जाऊ शकतील.




Thank You